Impact Factor : 1.9152 (UIF)
Volume - 3 | Issue - 10 | June– 2017

भाळवणी येथील प्राचीन मंदिरे व ऐतिहासिक वाडा
महादेव मंदिर

समाधान हाके
संशोधक एम.ए.एम.फील

प्रस्तावना :

भाळवणी हे गाव पंढरपूर तालुक्यात असून पंढरपूर पासून २८ कि.मी. अंतरावर आहे. भाळवणी येथे महादेव मंदिर असून त्यांचे बांधकाम पूर्ण हेमाडपंथी आहे. या मंदिराचा कालखंड साधारण इ.स. १२ ते १३ व्या शतकातील असावा.

सभामंडप :

हे संपूर्ण मंदिर हेमाडपंथी असून सभामंडपात १८ दगडी स्तंभ आहेत. त्यावर हे मंदिर टैकले असावे. एका रांगेत ५-५ स्तंभ दिसतात. तसेच भिंतीत दोन्ही बाजूला ४-४- स्तंभ दिसतात. आत सभामंडपात भिंतीत छोटे छोटे कप्पे दिसतात. तेथे पूर्वी विरगळ होत तसेच दोन मूर्तीही होत्या. मूर्ती सध्या मंदिराबाहेर भग्न अवस्थेत आहे.

मुख्य मंदिर :

मुख्य मंदिरात आत एक शंकराची पिंड आहे. त्याच्या समोर १ नंदी आहे. शंकराची पिंड साधारणता लहान आहे त्या पिंडीची रोज पूजा केली जाते.

शिखर :

मंदिरावर शिखर छोटेसे आहे ते बहुधा नंतरच्या कालखंडात तयार केलेले असावे. या मंदिराचे शिखर घुमटाकृती तयार झालेले आहे. त्याच्यावरच शिखरासारखा तीन फूट उंचीचा भाग दिसतो. पूर्वी हे शिखर नसावे. नंतरच्या कालखंडात काही सत्ताधिकाऱ्यांनी याच्यावरील काम केले असावे.

वीरगळ :

या महादेव मंदिराच्या बाहेर आज आपणास विविध आकाराचे १० वीरगळ पाहावयास मिळतात. या १० वीरगळावर वेगवेगळे प्रसंग कोरलेले दिसतात.

भग्नमूर्ती :

या वीरगळाच्या शेजारी अवस्थेत दोन मूर्ती आहेत त्यात चार हात असलेली एक मूर्ती आहे. मूर्तीवरून ती विष्णूची असावी तर दूसरी एक स्त्रीप्रतिमा असावी. तिचे शरीर भंगलेले आहे.

अष्टभूजागणेश मंदिर

अष्टभूजा गणेशमंदिर :

भाळवणी येथे एक छोटेसे अष्टभूजा म्हणजे आठ हात असलेले गणेशमंदिर आहे. त्याचा कालखंड इ. स. १४-१५ व्या शतकातील असावा.

गणेशमूर्ती :

येथे ५ फूट उंचीची गणपतीची मूर्ती आपणास पाहावयास मिळते. या मूर्तीला ८ हात आहेत. आठही हातात विविध शस्त्रात्रे व प्रतिके दिसतात या गणपतीची सोंड उजवीकडे आहे.

पाच फणीचा नाग :

गणेश मूर्तीच्या दोन्ही बाजूस पाच फणीचे नाग आहेत ज्या दगडावर गणेश मूर्ती आहे. त्याच दगडावर हे नाम दोन्ही बाजूला आहेत या गणेशमूर्तीवर उजव्या बाजूस दोन पुरुष दिसतात.

मंदिराचे शिखर :

हे मंदिर छोटेसे असून ते पूर्ण दगडी असून त्यावर एकावर एक पायऱ्या ठेवल्याप्रमाणे आहे व त्यावर घुमटाकृती शिखर असून चारही बाजूस आपणास मनोरे पाहावयास मिळते. याचा कालखंड साधारणातः १४ व्या शतकातील असावा.

नाईक निंबाळकर वाडा

प्रस्तावना :

भाळवणी येथे एक वाडा आहे, तो १६४५ च्या दरम्यानचा आहे हा वाडा पाच एकराचा असून उद्ध्वस्त झाला आहे. या वाड्यात सध्या एक त्यावेळीची विहिर आहे. वाड्याचे प्रवेशव्दार लाकडी दरवाज्याचे असून काही प्रमाणात सुस्थितीत आहे. आज काही प्रमाणात त्यावेळीचे अवशेष पाहावयास मिळतात.

राजकर्त्याविषयी माहिती :

इ. स. १६४१ मध्ये विजापूरच्या आदिलशहाने या विभागाचे वाटप करून दिले. या गावाच्या नियंत्रणाखाली आसपासच्या ४३ गावाचा कारभार चालत होता.

मुदोजी नाईक निंबाळकर हे येथील कारभार पाहत असत, त्यांना ३ मुले होती. जगदेवराव, साबाजी, बजाजी व सईबाई ही मुलगी होती. सध्या त्यावेळेची काही कागदपत्रे उपलब्ध आहेत. त्यावेळीचे सनद आज उपलब्ध होते.

हा वाडा संपूर्ण दगडी असून तेथे भुयारी मार्ग होते असे येथील लोक सांगतात. आजही काही प्रमाणात वाड्यात असे भुयारासारखे काही अवशेष दिसतात. तेथील लोक म्हणतात कि हे तळघर आहे.

भुयारे/तळघर :

या वाड्यात भुयारे/तळघर आहेत असे येथील लोक सांगतात आज त्या वाड्यात २ घरे आहेत. तेथील तळघरात २ वर्षापूर्वी काही लोखंडी वस्तू तलवारी गंजलेल्या अवस्थेत सापडल्या, तसेच एक तोप ही सापडली. येथील लोक असे सांगतात कि येथून (भाळवणी) ५ कि.मी. अंतरावर असणाऱ्या मार्डी गावापर्यंत भुयार होते. पण आत्ता अस्तित्वात नाही.

तोफ :

येथील तळघरात दोन वर्षापूर्वी काही गंजलेल्या तलवारीचे तुकडे व एक तोफ सापडली ती तोफ ४० किलो वजनाची असून ३/४ फूट लांबीची आहे. ती सामान्यता सुस्थितीत आहे ती उंटावरून / हत्तीवरून उडवण्यासाठी याचा वापर केला जाई.

विहिर :

या वाड्यात एक चौकोणी आकाराची विहिर आहे. त्यात जनावरे उतरण्यासाठी कोरे लांब आकाराच्या पायऱ्या असलेली आहे. ती आज बऱ्या अवस्थेत आहे. तिचा वापर आजही येथील लोक करतात.

संदर्भ ग्रंथ सुची :

१) जोशी जी. पु. भारतीय मूर्तीशास्त्र महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मिती मंडळ राज्य संग्रहालय, लखनऊ १९७९
२) जोशी म. च. युगयुगीन कला राजस्थानी ग्रंथागार जोधपूर १९९५
३) दे गलूरक गो. ब. मराठवाड्यांनी मंदिरे आणि शिल्पे, मराठवाडा संशोधन मंडळ शिरुर ताजबंद १९७५
४) पाठक अ. शं. (संपादित) महाराष्ट्र राज्य गॅझेटियर इतिहास प्राचीन खंड १, भार २ दर्शनिका विभाग मुंबई - २
५) माटे म. श्री. प्राचीन भारतीय काल ॲन्टि नेन्टल प्रकाशन पुणे १९८०
6) Kunte B. G. Solapur District Gazetteer, Bombay 1977
७) डॉ. गाजरे सुनिता, सोलापूर जिल्ह्यातील ऐतिहासिक गड्या लक्ष्मी बुक्स पब्लिकेशन, सोलापूर २०१६